ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २३ | पुणें, बुधवार तारीख ६ मार्च, १९५७ | अंक १०

## विविध माहिती

**मँगेनीझच्या खाणी**—शुद्ध मँगेनीझ हा धातू कमी प्रमाणांत असणाऱ्या मँगेनीझच्या खाणी कशा प्रकारें चालविण्यांत याव्या तें सुचविण्यासाठीं भारतीय सरकारनें तज्ज्ञांची एक कमिटी नेमली आहे. अशा प्रकारच्या मँगेनीझच्या खाणी राजस्थानांत व पश्चिम भारतांत आहेत. कमिटीनें आपला अहवाल एप्रिल–मे १९५७ पर्यंत सादर करावयाचा आहे.

**भारतांत जपानचे उद्योगपती**—भारताकडून १२ लाख टन अशुद्ध लोखंड खरेदी करण्याच्या वाटाघाटी करण्यासाठी जपानी उद्योगपतींचें एक मंडळ भारतांत आलें आहे. भारतामधील बंदरांची कुवत लक्षांत घेतां ह्यापेक्षा अधिक माती निर्यात करतां येणार नाहीं असें समजतें. हा व्यवहार स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन-मार्फत होईल.

**पाकिस्तानला अमेरिकेचें कर्ज**—पूर्व–पाकिस्तानांत एक मोठें धरण बांधण्यासाठीं अमेरिकेनें पाकिस्तानच्या सरकारला २·०५ कोटी डॉलर्सचें दीर्घ मुदतीचें कर्ज दिलें आहे. वॉशिंग्टन येथील पाकिस्तानच्या वकिलातींत ह्यासंबंधीच्या करारावर उभयतां राष्ट्रांच्या प्रतिनिधींनीं सह्या केल्या. पश्चिम पाकिस्तानच्या मानानें पूर्व–पाकिस्तान औद्योगिकदृष्ट्या मागासलेला आहे.

**जपान ते युरोप विमान–प्रवास**— जपानहून युरोपला उत्तर ध्रुवावरून प्रवास करणारी वैमानिक वहातुक सुरू करण्यांत आली आहे. हा नवा मार्ग एका स्कँडेनेव्हिअन कंपनीनें सुरू केला आहे. प्रवासाचा मार्ग ८,००० मैलांचा असून तो कापण्यास विमानाला सुमारें ३०॥ तास लागतील. वाटेंत तेल घेण्यासाठी विमान एकदांच अलास्कामध्यें उतरेल.

**अमेरिकन संस्थेची मदत**—भारतामधील खेडेगांवांना मदत करण्याची एक योजना 'केअर' ह्या अमेरिकन संस्थेनें आखली आहे. मदतीच्या योजनेप्रमाणें १९५७ सालीं संस्थेतर्फे खेड्यांना अन्नधान्यें, औषधें, शेतीचीं अवजारें ग्रामोद्योगाची यंत्रसामुग्री, इत्यादि साहित्य पुरविण्यांत येईल. साहित्याची किंमत सुमारें २ कोटी रुपये असेल.

**संस्कृत राष्ट्रभाषा करा**—भारत सरकारनें नेमलेल्या संस्कृत कमिशनपुढें साक्ष देतांना सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ श्री. सी. व्ही. रमण म्हणाले कीं हिंदीपेक्षा संस्कृतला राष्ट्रभाषेचा मान देणें अधिक योग्य होईल. भारतामधून इंग्लिश पूर्णपणें नाहींसें झाल्याच्या दिवसाची कल्पनाहि करतां येणें कठीण आहे. इंग्लिशच्या खालोखाल संस्कृत हीच महत्त्वाची भाषा आहे.

**मच्छीमारीच्या धंद्याचें शिक्षण**—मच्छीमारीच्या धंद्याचें शिक्षण घेऊन येण्यासाठी भारत सरकारच्या कांहीं अधिकाऱ्यांना जपानमध्यें व ऑस्ट्रेलिआमध्यें पाठविण्यांत येणार आहे. त्याच-प्रमाणें गवती कुरणांचा विकास करण्याचें शिक्षण घेण्यासाठीहि कांहींना परदेशांत पाठविण्यांत आलें आहे.

**३९८ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या**—मॅट्रिक पास झाल्यावर ज्या गरीब पण हुषार विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेतां येत नाहीं अशांना शिष्यवृत्त्या देण्याची योजना भारत सरकारनें १९५६ सालीं सुरू केली होती. राज्यसरकारच्या शिफारसींना अनुसरून भारत सरकारनें चालू सालीं ३९८ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या जाहीर केल्या आहेत.

**तेलकामगारांना बोनस**— आसाम ऑइल कंपनीनें आपल्या कामगारांना तीन महिन्यांच्या मूळ पगाराइतका बोनस देण्याचें ठरविलें आहे. बोनस १९५४ ते १९५८ ह्या सालाकरितां देण्यांत येणार आहे. कंपनी व कामगार ह्यांच्यांत चाललेला बोनसविषयींचा तंटा मिटवून औद्योगिक शांतता नांदावी म्हणून हा निर्णय घेण्यांत आला आहे.

**सरकारी नोकरांना सक्तीचा विमा**—भारत सरकारनें आपल्या नौकरांना सक्तीनें विमा उतरविण्यास लावण्याचें ठरविलें आहे असें समजतें. पण अजून अखेरचा निर्णय झालेला नाहीं. विम्याची रक्कम सुरवातीला तरी १,००० रु. चीच असेल. देशांत विमा उतरण्याच्या प्रवृत्तीची वाढ व्हावी म्हणून हा उपक्रम करण्यांत येण्याचा संभव आहे.

**अंदमान बेटांतील वसाहती**—अंदमान बेटांत वसाहत करण्यासाठीं केरळ राज्यांतील ६६ विनाजमीन असलेल्या कुटुंबांची यंदा निवड करण्यांत येणार आहे. प्रत्येक कुटुंबाला साफ केलेली ५ एकर जमीन व ५ एकर पडीत जमीन देण्यांत येईल. त्याशिवाय कर्ज व मदत म्हणून कांहीं रोख रक्कमहि देण्यांत येईल.

**भारतीय चित्रांचें प्रदर्शन**—ब्रिटनच्या आर्टस कौन्सिलनें राजस्थानमधील चित्रकारांच्या कलाकृतींचें एक प्रदर्शन लंडन-मध्यें भरविलें आहे. प्रदर्शनांत ७२ चित्रें ठेवण्यांत आलीं आहेत. सर्व चित्रें राजस्थानांतील हिंदु संस्कृति दर्शविणारीं आहेत. महिनाभरानंतर प्रदर्शन ब्रिटनमधील आणखी कांहीं मोठ्या शहरांतून फिरविण्यांत येईल.

**पश्चिम जर्मनीचें व्यापारी मंडळ**—पश्चिम जर्मन सरकारचें एक व्यापारी मंडळ दक्षिण आशिआंतील कांहीं देशांचा दौरा करण्यासाठीं आलें आहे. पाकिस्तान, सीलोन, भारत व ब्रह्मदेश ह्या देशांत ते सहा आठवडे फिरेल. ह्या देशांना जर्मनी काय तांत्रिक मदत देऊं शकेल, ह्याविषयीं मंडळ अभ्यास करणार आहे.

## दशमान पद्धतीचीं नाणीं व बँका

### १ एप्रिलपासून बदल अमलांत येणार

१ एप्रिल, १९५७ पासून दशमान पद्धतीचीं नाणीं सुरू होणार आहेत. सध्यांचीं नाणीं आणखी कांहीं वर्षें चालू राहिलीं तरी १ एप्रिलपासून बँकांना व सहकारी सोसायट्यांना नव्या नाण्यांतच हिशेब ठेवावें लागतील. ३१ मार्चअखेर वेगवेगळ्या खात्यांत असलेल्या रकमांचें दशमान पद्धतींत रूपांतर करून त्या पद्धतीच्या नाण्यांत १ एप्रिलपासून हिशेब ठेवावे लागतील; आण्यांची जागा नया पैसा घेईल. गिऱ्हाइकांनीं आणे व पैमध्यें चेक काढलेले असतील, त्यांचें प्रथम दशमान नाण्यांत रूपांतर करून ती रक्कम नांवें टाकावी लागेल. बँकेंत भरणा होणाऱ्या रकमा स्वीकारतांनाच त्यांचें रूपांतर करून स्वीकाराव्या लागतील. १ एप्रिलपासून क्लिअरिंगला पाठवावयाच्या चेकांचें दशमान नाण्यांतच देणें-घेणें मिटवलें पाहिजे. कलेक्टिंग बँकेनें पेन्सिलीनें दशमानाचे आकडे लिहावयाचे आहेत; कव्हरिंग पत्रांतहि दशमानाचे आकडेच दाखविले पाहिजेत. १ एप्रिलच्या अगोदरच बँकांना दशमान नाणीं भरपूर पुरविण्यांत येणार आहेत. जुन्या-नव्या नाण्यांच्या अदलाबदलीचे तक्तेहि छापून तयार होत आहेत. आणे-पैच्या पद्धतींतून नया पैशाच्या पद्धतींतील प्रवेश सोपा जावा ह्यासाठी २९ व ३० मार्च रोजीं बँकांना सुटी जाहीर करण्यांत येण्याचा संभव आहे. ३० जून व ३१ डिसेंबर रोजीं सुटी असते त्याच धर्तीवर ही सुट्टी जाहीर केली जावी असा प्रयत्न चालू आहे. १ एप्रिल, १९५७ ह्या दिवशीं मुंबई सरकारनें सुट्टी दुसऱ्या कारणासाठी (गुढी पाडवा) अगोदरच जाहीर केलेली आहे, आणि ३१ मार्च रोजीं तर रविवारच आहे. भारत सरकारला ह्याबाबत आपला निर्णय लवकरच जाहीर करावा लागेल. कांहीं झालें तरी बँकांना पूर्वतयारीला आतांपासूनच लागलें पाहिजे.

---

## दि भारत इंडस्ट्रियल बँक लिमिटेड, पुणें

### संचालकांचा ३१-१२-५६ अखेरच्या वर्षाचा अहवाल

अहवालाचे सालीं बँकेचे व्यवहारांत निव्वळ नफा रुपये २५,१३२-२-१० झाल्याचें दिसून येईल. त्यामध्यें गतवर्षीचा शिलकी नफा रुपये ३,६९७-१०-० मिळविला असतां एकूण नफा रुपये २८,८२९-१२-१० इतका विभागणीसाठी उपलब्ध होतो. या रकमेची वांटणी खालीलप्रमाणें व्हावी अशी संचालकांची शिफारस आहे.

| | |
|---|---|
| रिझर्व्ह फंडांत जमा करण्यासाठी (बँकिंग कंपनीज ॲक्ट १९४९ चें कलम १७ अन्वयें) | रु. ५,६००--०--० |
| कर्जरोख्यावरील घसारा फंडासाठी | रु. ४,९००--०--० |
| कंटीजन्सी फंडासाठी | रु. १,५००--०--० |
| ६ टक्के क्यु. प्रे. शेअर्सवर डिव्हिडन्ड देण्यासाठी | रु. १,२२५--०--० |
| शिलक पुढील वर्षासाठी (Subject to taxation and depreciation) | रु. १५,६०४-१२-१० |
| | रु. २८,८२९-१२-१० |

अहवालाचे सालीं बँकेचे व्यवहार समाधानकारक झाले. बँकेकडे असणाऱ्या ठेवींमध्यें साडेतीन लाख रुपयांचेवर वाढ झाली आहे. बँकेच्या शाखांचें कामकाजहि समाधानकारक होत आहे.

## एप्रिल ते डिसेंबरमधील नव्या कंपन्या

### नोंदणीचें प्रमाण उतरलें

१९५६-५७ च्या पहिल्या नऊ महिन्यांत सर्वंच भारतांत मिळून ६३७ लिमिटेड कंपन्या नोंदण्यांत आल्या. त्यांपैकी ६५ पब्लिक व बाकीच्या ५७२ प्रायव्हेट होत्या. नऊ महिन्यांतील नोंदणीवरून वार्षिक नोंदणीचा आंकडा सुमारें ८५० होईल; १९५५-५६ ह्या वर्षांत १४४८ कंपन्या नोंदण्यांत आल्या होत्या. म्हणजे, नव्या कंपन्यांची संख्या बरीच कमी झाली आहे १९५५-५६ मध्यें दरमहा ११० कंपन्या नोंदल्या जात होत्या; चालू वर्षीची मासिक सरासरी ७० कंपन्यांची आहे.

### राज्यवार वांटणी

६३७ कंपन्यांची राज्यवार वांटणी खालीलप्रमाणें आहे:—

| | |
|---|---|
| प. बंगाल | २४४ |
| मुंबई | ११३ |
| दिल्ली | ८५ |
| मद्रास | ८१ |
| इतर | ११४ |
| | ६३७ |

म्हणजे, नव्या नोंदणीपैकी सुमारें पांच-शष्टमांश कंपन्या चार राज्यांतच नोंदल्या गेल्या; आणि त्यांतहि प. बंगालचा वांटा खूपच मोठा आहे.

### ३३ मोठ्या कंपन्या

नोंदलेल्या एकूण कंपन्यांपैकी ज्या कंपन्यांचें अधिकृत भांडवल ५० लक्ष रुपये किंवा त्यापेक्षा अधिक आहे, अशा ३३ कंपन्या आहेत. ह्या ३३ कंपन्यांचें मिळून अधिकृत भांडवल १६१·८५ कोटी रु. आहे. म्हणजे ६३७ कंपन्यांच्या मिळून अधिकृत भांडवलाच्या तें ८७% आहे. ३४७ कंपन्यांचें प्रत्येकी अधिकृत भांडवल ५ लक्ष रुपयांपेक्षा कमी आहे आणि १८७ कंपन्यांचें प्रत्येकी अधिकृत भांडवल ५ लक्ष ते १० लक्ष रुपये आहे. गेल्या वर्षीपेक्षा चालू वर्षीं नव्या कंपन्यांची भर कमी पडली असली, तरी वसूल भांडवलांतील वाढ मात्र जास्त आहे.

### सरकारी कंपन्या

चालू वर्षीं ७ सरकारी कंपन्या नोंदल्या गेल्या. त्यांपैकी ५ कंपन्यांचें अधिकृत भांडवल १० कोटी रुपये किंवा त्यापेक्षा अधिक आहे. बिहार राज्यांत नोंदलेल्या नॅशनल कोल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनचें अधिकृत भांडवल ५० कोटी रुपये आहे.

---


## नोटीस

### दि बँक ऑफ कराड, लि. कराड.

बँकेच्या भागीदारांची अकरावी वार्षिक साधारण सभा सोमवार तारीख २५ मार्च १९५७ रोजीं दुपारीं ४ वाजतां कराड येथें बँकेच्या ऑफिसांत सभासदांना स्वतंत्रपणें पाठविलेल्या नोटिसींत नमूद केल्याप्रमाणें कामकाज करण्यासाठी भरणार आहे. सदर वेळीं बँकेच्या सभासदांनीं अवश्य येण्याचें करावें अशी विनंती आहे.

कराड, तारीख २८-२-१९५७

म. वि. खडकर,
मॅनेजर.

# अर्थ

बुधवार, ता. ६ मार्च, १९५७





संस्थापक:
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक:
श्रीपाद वामन काळे


## खेड्यांतील सावकारी व शेतीविषयक कायदे

भारत सरकारच्या अन्न व शेतकी खात्यातर्फे आर्थिक व इतर बाबींसंबंधी आंकडेवार माहिती जमा करण्यांत येत असते. ही माहिती जमा करणाऱ्या संघटनेनें 'भारतामधील शेतकी-विषयक कायदे' ह्या पुस्तकाची नवी आवृत्ति प्रसिद्ध केली आहे. राज्य-सरकारांनीं १८७९ सालापासून खेड्यांतील सावकारीचा धंदा नियंत्रित करण्यासाठी जे कायदे केले त्यांचें कार्य कसें काय झालें, ह्यासंबंधीचा आढावा पुस्तकांत घेण्यांत आला आहे.

सावकारी नियंत्रित करण्यासाठी जे कायदे करण्यांत आले त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी जवळ जवळ कोणत्याच राज्यांत योग्य अशी खास यंत्रणा उभारण्यांत आली नव्हती, हें नमूद करून आढाव्यांत असें म्हटलें आहे कीं शेतकऱ्याला खाजगी सावकाराकडून ज्या अटींवर कर्ज मिळतें त्यांत फारशी सुधारणा झालेली आढळून येत नाहीं. हे कायदे अंमलांत आणण्याचें काम ज्या अधिकाऱ्यांवर टाकण्यांत आलें त्यांच्यावर आधींच इतर जबाबदाऱ्या टाकण्यांत आलेल्या होत्या. सावकारीचें नियंत्रण करण्यासाठीं जे उपाय कायद्यांत नमूद करण्यांत आले आहेत, त्यांपैकीं बहुतेक सर्व महत्त्वाचे उपाय नाकाम करण्याचें सावकारांना सहज शक्य झालेलें आहे. ह्याचीं कारणें बहुविध आहेत. एक तर कायद्याच्या अंमलबजावणीसंबंधींची देखरेख नीट करण्याची व्यवस्था नाहीं; गरजू शेतकऱ्याला जरूर तें कर्ज मिळण्याची अन्य व्यवस्था नाहीं; आणि त्याची कर्जाची आवश्यकता अत्यंत तांतडीची असते त्यामुळें त्याला वाटेल त्या अटींवर कर्ज काढावेंच लागतें. तथापि, सावकारी नियंत्रणाच्या कायद्यांमुळें कर्जाच्या व्यवहारावर आळा बसण्यास मदत झाली आहे, आणि शेतकऱ्याला मिळणाऱ्या कर्जाच्या पुरवठ्यांत घट झालेली आहे. शेतकरी कर्ज काढतो तें प्रत्येक वेळीं उत्पादक कामासाठीं काढतो असें नाहीं. कांहीं वेळां तो कुटुंबाचा खर्च चालविण्यासाठींहि सावकाराच्या दारीं जातो. तेव्हां कर्जाच्या पुरवठ्यांत झालेली घट सर्वथैव अहितकारी होती, असें समजण्याचें कारण नाहीं.

शेतीच्या कामासाठी पैसा पुरविण्याचें काम बँका, सहकारी संस्था व राज्यसरकारें ह्यांच्याकडून अलीकडे अधिक मोठ्या प्रमाणावर होऊं लागलेलें आहे हें खरें; पण तरीसुद्धां अजूनहि खेड्यांतील कर्जाचे व्यवहार बहुशः सावकारांच्या मार्फतच होत असतात. शेतकऱ्यांना लागणाऱ्या एकूण कर्जापैकी ६९.७ टक्के रक्कम अद्यापहि खेड्यांतील धंदेवाईक सावकाराकडूनच पुरविली जाते. ह्यांतच व्यापारी व जमीनमालक ह्यांच्याकडून देण्यांत येणारी रक्कम मिळविली तर खाजगी व्यक्तींकडून पुरविल्या गेलेल्या कर्जाची टक्केवारी ७७ पर्यंत जाते. तुलनेनें पहातां सरकारी संघटना, सहकारी संस्था व व्यापारी बँका ह्यांच्यातर्फे अवघी ७.३ टक्के रक्कम पुरविली जाते असें आढळून येतें. ह्यावरून खाजगी सावकारीचा शेतीवर किती प्रभाव आहे हें दिसून येतें. भारतामधील ग्रामीण अर्थव्यवस्थेची आतांपर्यंतची अवस्था लक्षांत घेतां हें कदाचित् अनिवार्यहि असेल; पण त्यामुळें शेतकरी समाजांतील संबंध आणि शेतीची अर्थव्यवस्था ह्यांच्यावर फार विपरीत परिणाम झालेले आहेत ह्यांत मात्र शंका नाहीं.

ज्याची पत फारशी निर्धोक नाहीं अशा शेतकऱ्याला कर्ज देतांना सावकाराला मोठी जोखीम पत्करावी लागते. त्यामुळें खेडेगांवांत हा धंदा करणारी असामी व्यापारांत घेतल्या जाणाऱ्या कमी व्याजाच्या दरापेक्षा अधिक व्याजाचा दर लावते; नव्हे तसें करणें त्या व्यक्तीला भागहि पडतें. कारण, संघटित व्यापार-व्यवहारांतील जोखीम तो घेत असलेल्या जोखमींपेक्षा पुष्कळच कमी असते. हें जरी खरें असलें तरी, शेतीच्या अर्थव्यवस्थेंत व्याजाचा दर जास्त असल्यामुळें, ज्या शेतकऱ्यांना आपली जमीन कर्जासाठी तारण म्हणून देतां येणें शक्य होतें त्यांना तरी मुक्त हस्तानें कर्ज देणें सावकाराला इष्ट वाटतें हें कांहीं खोटें नाहीं. खाजगी सावकारांकडून सुलभतेनें व ऐनवेळीं कर्ज मिळतें, हा त्या पद्धतीचा एक मोठा गुणच म्हटला पाहिजे. तथापि ग्रामीण अर्थव्यवस्थेंत हाच गुणदोष ठरला आणि त्याच्या अनेक दुष्परिणामांपैकी एक झाला आहे कीं पुष्कळ शेतकरी ह्याच गुणामुळें अगर दोषामुळें कायमचे आर्थिक अडचणींत सांपडले. आधींच कर्जबाजारी झालेला असल्यामुळें घेतलेल्या कर्जाचा उत्पादन वाढविण्यासाठी त्याला उपयोग करतां आला नाहीं. शेतीवर गुजराण करणाऱ्या लोकसंख्येंत वाढ झाल्यामुळें उत्पादन वाढविण्याची अतिशय गरज होती; उलट भारी व अनुत्पादक कर्जाचा डोंगर वाढून परिस्थिति अधिकच बिकट झाली. हीं कर्जें मुख्यतः लग्न व इतर प्रकारच्या कौटुंबिक खर्चासाठी काढलीं गेलेलीं असतात.

अलिकडे ग्रामीण विभागांचा विकास करण्याच्या कामांत राज्यसरकारें भाग घेऊं लागलीं आहेत. त्यामुळें शेतीसाठी देण्यांत येणाऱ्या कर्जाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला आहे. सावकारांकडून शेतकऱ्यांची पिळणूक होऊं नये एवढ्याच उद्देशानें आतां पतदार शेतकऱ्याला कर्जें दिलीं जात नाहींत. ग्रामीण विकासाच्या कार्यक्रमांत शेतीसाठी देण्यांत येणाऱ्या कर्जाला अतिशय महत्त्वाचें कार्य करावयाचें असतें, ह्याची जाणीव आतां झालेली आहे. खाजगी सावकारीशीं कर्जें देण्याच्या बाबतींत जोराची स्पर्धा करणारी दुसरी व्यवस्था उभारण्यांत आली म्हणजे ग्रामीण विभागांचा विकास करण्याच्या कार्यांत सावकारच अधिक फलद्रूप ठरणारी कामगिरी करून दाखवितील आणि ह्या परिस्थितींत सावकारीचें नियंत्रण करणारी सरकारी यंत्रणाहि परिस्थितीशीं अधिक जुळती अशी ठेवणें शक्य होईल.

## त्रावणकोर-कोचीन बँकिंग चौकशीचा अहवाल प्रसिद्ध झाला

त्रावणकोर-कोचीन बँकिंग चौकशी कमिशन भारत सरकारनें जानेवारी, १९५६ मध्यें गजेंद्रगडकर बँक अवार्ड कमिशनच्या सूचनेप्रमाणें नेमलें होतें, त्याचा अहवाल नुकतांच प्रसिद्ध झाला आहे. तेथील बँकांतील नोकरांच्या पगार–भत्त्याविषयक कमिशनच्या शिफारसी भारत सरकारनें मान्य केल्या आहेत.

गजेंद्रगडकर कमिशननें ४ "क" वर्गीय बँकांना (१ कोटी रु. पेक्षा ज्यास्त परंतु ७½ कोटी रु. पेक्षा कमी सेळत्या भांडवलाच्या बँकांना) आणि १२ "ड" वर्गीय बँकांना (१ कोटी रु. पेक्षा कमी सेळत्या भांडवलाच्या बँकांना) क्षेत्र नं. ४ मधील (३३,००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या ठिकाणच्या) शाखांचे बाबतींत अवार्डच्या अंमलबजावणीची माफी दिली होती.

दुसरी तपशीलवार चौकशी होईपर्यंतच ही माफी चालूं असावी, असें गजेंद्रगडकर कमिशननें म्हटलें होतें. बँक अवार्ड लागू नसलेल्या १३६ बँकांची (ज्या बँकांच्या राज्याबाहेर शाखा नाहींत) खास चौकशी व्हावी, अशीहि त्या कमिशनची सूचना होती.

त्रावणकोर–कोचीन बँकिंग कमिशननें शिफारस केली आहे कीं, गजेंद्रगडकर कमिशननें वरील ४ 'क' व १२ 'ड' वर्गीय बँकांना दिलेली माफी ह्यापुढें चालूं राहूं नये; त्याचप्रमाणें २ 'क' वर्गीय बँकांनीं (साउथ इंडियन बँक लि. व कॅथॉलिक सिरिअन बँक लि.) लेबर अपेलेट ट्रायब्यूनलचा निवाडा १ एप्रिल, १९५४ पासून अमलांत आला असें समजून त्याप्रमाणें वागावें व इतर बँकांनीं १ जानेवारी, १९५६ पासून त्याची अंमलबजावणी करावी. भारत सरकारनें ह्या शिफारशींची छाननी करून वरील १ एप्रिल, १९५४ चे जागीं १ जानेवारी, १९५५ ही तारीख घातली आहे. ह्याप्रमाणें इंडस्ट्रिअल डिस्प्यूट्स (बँकिंग कंपनीज) डिसिजन ॲक्ट, १९५५ मध्यें दुरुस्ती केली जाईल. पण त्याची वाट न पहातां, बँकांनीं नोकरांना त्याप्रमाणें पगार–भत्ते द्यावेत, असा बँकांना सल्ला देण्यांत आला आहे. १ जानेवारी, १९५६ पासूनची देणें बाकी ३१ मार्च, १९५७ पूर्वी दिली पाहिजे व १९५५ ची देणें बाकी दोन सारख्या सहामाही हप्त्यांत उपरिनिर्दिष्ट दोन 'क' वर्गीय बँकांनीं देऊन टाकावयाची आहे. पहिला हप्ता १ सप्टेंबर, १९५७ रोजीं दिला पाहिजे.

ज्यांना अवार्ड लागू नाहीं, अशा बँकांच्या नोकरांसाठी कमिशननें किमान पगार सुचविला आहे. कमिशनच्या शिफारसी राज्य सरकाराकडे योग्य त्या कृतीसाठी धाडण्यांत आल्या आहेत. कमिशननें तेथील बँकांचा कारभार सुधारण्याच्या दृष्टीनें इतरहि कित्येक शिफारसी केल्या आहेत. परंतु, त्या एकमुखी नाहींत. त्यांची तपशीलवार छाननी करून व हितसंबंधींचा विचार घेऊन सरकार त्याबाबत पुढें पाऊल टाकील.

## राजकीय पक्षांना व्यापारी कंपन्यांची वर्गणी

### कलकत्ता हायकोर्टाचा धोक्याचा इशारा

इंडियन आयर्न ॲन्ड स्टील कंपनी लि. नें कलकत्ता हायकोर्टाकडे अर्ज करून, आपल्या मेमोरँडममधील दुरुस्तीस मंजुरी मागितली. ह्या दुरुस्तीचा उद्देश, कंपनीला राजकीय पक्षांच्या फंडांना वर्गणी देतां यावी, असा आहे. ही मंजुरी देतांना न्यायमूर्ति मुकर्जी ह्यांनीं खालीलप्रमाणें उद्गार काढले :—

"राजकीय पक्षांच्या फंडांना वर्गणी देण्यासाठी मंजुरी मागणाऱ्या कंपन्यांची संख्या वाढत चालली आहे. ह्यासंबंधींतील धोके व नुकसानी ह्यांस वेळेवरच आळा घालण्यासाठी व लोकशाहीचा व राज्यकारभाराचा झरा शक्यतों शुद्ध राखण्यासाठी सरकारनें कायदा करणें जरूरीचें आहे. राज्यघटनेंत व कंपनी-कायद्यांत तशी बंदी नसल्याकारणानें आज कोणत्याहि कंपनीस राजकीय पक्षांच्या फंडांना वर्गणी देण्यास बंदी करतां येणार नाहीं; परंतु अशी वर्गणी देण्यामुळें व्यापारी आणि सार्वजनिक जीवनाची पातळी खाली जाण्याचा संभव आहे. ह्या गंभीर गोष्टीकडे लक्ष वेधणें कोर्टाचें कर्तव्यच आहे. राजकीय पक्षांना पैसा पुरविणें, हा जॉइंट स्टॉक कंपन्यांच्या स्थापनेचा वास्तविक हेतु असत नाहीं; त्या कंपन्यांत राजकीय पक्षांना वर्गणी देण्याचे बाबतींत स्पर्धा होऊं लागणें फारच धोकादायक आहे. सर्वांत ज्यास्त वर्गणी देणारी कंपनी तिच्या प्रतिस्पर्ध्यापेक्षा ज्यास्त गैरफायदे मिळवूं शकेल! तिसरी गोष्ट म्हणजे बड्या व्यापारी–कारखानदारांच्या म्हणण्यास राजकीय जीवनांत प्रभावी महत्त्व प्राप्त होईल."

टाटा आयर्न ॲंड स्टील कं. लि. च्या अशाच प्रकारच्या अर्जास मुंबई हायकोर्टानें मंजुरी देतांना न्या. तेंडोलकर ह्यांनीं खालीलप्रमाणें उद्गार काढले होते :——

"एकाद्या उमेदवारानें किंवा पक्षानें स्वतःच्या मताविरुद्ध वागून कंपनीला पोषक असें धोरण ठेवण्यासाठी कंपनीनें त्याला पैसे देणें हें सार्वजनिक हिताचें होणार नाहीं. पण, जो उमेदवार किंवा पक्ष कंपनीला पोषक असें धोरण अगोदरच ठेवत असेल, त्याला कंपनीनें मदत करण्यास हरकत नाहीं. कंपनीचें धोरण सार्वजनिक हिताविरुद्ध आहे असें एकाद्याहि भागीदाराला वाटलें, तर त्यानें कोर्टांत कंपनीविरुद्ध इंजंक्शन मागावें."

**रशिअन शेतकऱ्यांना आमंत्रण**—भारत सरकारनें रशिअन शेतकऱ्यांच्या एका तुकडीला भारतांत तीन आठवडे दौरा करण्याचें आमंत्रण देण्याचें ठरविलें आहे. रशिअन शेतकरी आपल्या दौऱ्यांत समाजविकास योजना, संशोधन-केंद्रें आणि शेती व सांस्कृतिक संस्था ह्यांना भेटी देतील व त्यांचा अभ्यास करतील.

**कुराणाचें संस्कृतांत भाषांतर**—हैद्राबाद येथील एका सेवानिवृत्त सेशन्स जजांनीं समग्र कुराणाचें संस्कृतांत भाषांतर केलें आहे. संस्कृत भाषांतराचा पहिला अध्याय त्यांच्या मुसलमान मित्रांच्या साह्यानें प्रसिद्धहि करण्यांत आल्याची माहिती यांनीं संस्कृत कमिशनला दिली आहे.

तमाम दंतरोगांवर
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## पूना बँकर्स असोसिएशन

### श्री. दा. वा. पोतदार ह्यांचा सत्कार



खुर्चीवर बसलेले:—श्री. सोनाळकर ( सेंट्रल बँक ), श्री. दा. वा. पोतदार ( रिझर्व्ह बँकेच्या पश्चिम विभाग सल्लागार समितीचे सभासद ), श्री. मसानी ( बँक ऑफ इंडिया ).

उभे :—श्री. साठे ( बँक ऑफ पूना ), श्री. राणा ( देना बँक ), श्री. क्षीरसागर ( भारत इंडस्ट्रियल बँक ), श्री. काळे ( संपादक, अर्थ ), श्री. साळवेकर ( भारत इंडस्ट्रियल बँक ), श्री. मुजुमदार ( देना बँक ) श्री. गुमास्ते ( पंजाब को. बँक ), श्री. वाळिंबे ( देना बँक ), श्री. जोग, ( बँक ऑफ महाराष्ट्र ).

### नियतकालिकांच्या रजिस्ट्रेशनबाबतच्या केंद्र-सरकारच्या १९५६ मधील नियमानुसारचें ( क्र. ८ ) 'अर्थ' संबंधीचें प्रकटन

( १ ) प्रकाशन-स्थळ — ८२३, शिवाजीनगर, पुणें ४

( २ ) नियतकालिकाचें स्वरूप : दर बुधवारीं प्रसिद्ध होणारें साप्ताहिक.

( ३ ) मुद्रकाचें नांव — केशव गणेश शारंगपाणी

राष्ट्रीयत्व : भारतीय

पत्ता : ९१५।१ शिवाजीनगर, पुणें ४.

( ४ ) प्रकाशकाचें नांव — श्री. वा. काळे

राष्ट्रीयत्व : भारतीय

पत्ता : ८२३ शिवाजीनगर, पुणें ४.

( ५ ) संपादकाचें नांव — श्री. वा. काळे

राष्ट्रीयत्व : वर दिल्याप्रमाणें

पत्ता : वर दिल्याप्रमाणें

( ६ ) नियतकालिकाचे मालक, भागीदार, शेअरहोल्डर्स इत्यादींचीं नांवें व पत्ते — श्री. वा. काळे, ८२३, शिवाजीनगर, पुणें ४

मी, श्री. वा. काळे असें प्रकट करतों कीं, वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणें खरा आहे.

श्री. वा. काळे,
दि. १।३।१९५७ प्रकाशक

## पुढे पाऊल

( लेखक व प्रकाशक—श्री. श्री. वा. काळे, संपादक 'अर्थ' दुर्गाधिवास, पुणें ४. पृ. सं. १३१ + ८. किं. २ रु. )

अनेक भाषांत अनुवाद होण्याचें भाग्य ज्या थोड्या निबंध-लेखकांचे वाट्यास आलें आहे त्यांपैकीच आमचे सन्मान्य लेखक श्री. काळे हे होत. श्री. काळे ह्यांच्या 'कण आणि क्षण' या पुस्तकांत घरगुती प्रश्नांची चर्चा करण्यांत आली होती. प्रस्तुत पुस्तकांत त्या चर्चेनें पुढें पाऊल टाकलें असून दैनंदिन गृहजीवनापलीकडील कांहीं व्यापक समस्यांचा विचार केला आहे. मिश्रजीवनांतील खांचखळगे, बॉबकेसांच्या हौसेचें मोल, तुम्हीं अधिक चांगले पति होऊं शकतां, हेकट म्हातारे आणि कडवट तरुण, संसारांतील सारंगी, कॉलेजांतील मुली आणि त्यांचे आईबाप, वरसंशोधनाची आर्थिक मीमांसा, इ. कांहीं प्रकरणशीर्षकांवरूनहि लेखकानीं विचारार्थ घेतलेल्या व्यापक विषयांची कल्पना होईल. सूक्ष्म निरीक्षण, वस्तुनिष्ठ दृष्टि, स्वतंत्र आणि समतोल विचारशैली, ह्यांमुळें पुस्तक चित्ताचा वेध घेऊन विवेकी वाचकांस विचारसाधनास उत्कृष्ट साहाय्य करतें. व्यक्ति, कुटुंब व समाज यांच्या विरोधीही गरजांचा व हितसंबंधांचा मेळ कसा घालतां येईल, हें दाखविण्याचा लेखकाचा प्रयत्न यशस्वी झाल्यामुळें हें पुस्तकहि लोकप्रिय होईल यांत शंका नाहीं.

—पुरुषार्थ, मार्च १९५७

### हिंदुस्थान लिव्हरचा नफा

हिंदुस्थान लिव्हर लि. ला १९५६ मध्यें १०४ लक्ष रु. नफा झाला. करासाठी १२० लक्ष रु. बाजूस काढून हा नफा झाला आहे. नोव्हेंबर, १९५६ मध्यें कंपनीच्या शेअरविक्रीच्या वेळीं डायरेक्टरांनीं ६० लक्ष रु. नफ्याची अपेक्षा प्रकट केली होती व प्रत्येक भागाला ६ आणे डिव्हिडंड मिळेल, असें सुचविलें होतें. आतां १२ आणे ( ७५ नया पैसे ) डिव्हिडंड जाहीर होणार आहे.

### महाराष्ट्र बँकेला पुरोहित ट्रॉफी—क्रिकेटसंघाचें यश

बँक ऑफ महाराष्ट्र लि. नें यंदा दुसऱ्यांदा पुण्यांतील आंतर-बँकक्रिकेटच्या सामन्यांत पुरोहित ट्रॉफी मिळवली. ह्या ट्रॉफीचा अंत्यसामना सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. बरोबर ता. २४ फेब्रुवारी व ३ मार्चला खेळला गेला.

अंतिम धांवफलक खालीलप्रमाणें:—

सेंट्रल बँक १२४ पहिला डाव ( पाजणीकर २७ )
महाराष्ट्र बँक १७२ पहिला डाव ( वर्तक ७८, पिंपळखरे ६२ )
सेंट्रल बँक ९९ दुसरा डाव ( पाजणीकर ६० )
महाराष्ट्र बँक ५६ सात गडी बाद ( लेले २९ )

ही ट्रॉफी पांच वर्षांपूर्वी ठेवण्यांत आली असून, दोनदां महाराष्ट्र बँकेनें, व प्रत्येकीं एकदां सेंट्रल बँक, प्रेसिडेन्सी बँक व स्टेट बँक यांनीं मिळवली आहे.

**दूधदुभत्यांच्या उद्योगधंद्याला मदत**—कोलंबो योजनेप्रमाणें भारताला दूधदुभत्याच्या धंद्यासाठी न्यूझीलंडकडून मदत मिळालेली आहे. ह्या मदतीचा उपयोग कसा काय करण्यांत येत आहे तें पहाण्यासाठी त्या देशाचे तीन प्रतिनिधी भारतांत आले आहेत. ते देशाचा दोन आठवड्यांचा दौरा करीत आहेत. अशीच आणखीहि मदत देण्यास न्यूझीलंड तयार आहे.

## अमेरिकेच्या माजी अध्यक्षांना पेन्शन

अमेरिकेच्या अध्यक्षपदावरून दूर झाल्यावर ह्या माजी अध्यक्षांना पेन्शन देण्याच्या प्रश्नाचा विचार चालू आहे.) ह्या संबंधीचा कायदा अमेरिकेच्या सिनेटनें मंजूर केलेला असून आतां तो हौस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हज् समोर आहे. हें सभागृहहि तो बहुधा मंजूर करील. तसें झाल्यावर ज्या माजी अध्यक्षांना स्वतंत्र असें उत्पन्न नसेल त्यांची सोय होईल. अमेरिका हा देश इतका सधन आहे कीं बहुतेक सेवानिवृत्त बड्या सरकारी अधिकाऱ्यांना खाजगी उद्योगधंद्यांतून मोठ्या पगाराच्या जागा मिळूं शकतात. तथापि राष्ट्राची सेवाचाकरी बजावल्याबद्दल त्यांना राष्ट्रातर्फे कांहीं तरी मानधन देण्यांत यावें असा ह्या उपक्रमाचा उद्देश दिसतो. सिनेटमध्यें मंजूर झालेल्या कायद्या-प्रमाणें अमेरिकेच्या माजी अध्यक्षांना दरसाल २५,००० डॉलर्स पेन्शन देण्याची व्यवस्था होईल. अमेरिकेच्या रहाणीच्या मानानें ही रक्कम विशेष आकर्षक आहे, असें म्हणतां येणार नाहीं म्हणूनच कीं काय माजी अध्यक्षांना आणखीहि कांहीं सवलती देण्यांत येणार आहेत. त्यांना आपली कचेरी थाटता यावी म्हणून जागा देण्यांत येईल आणि कचेरीच्या खर्चासाठी दरसाल ३५,००० ते ४०,००० डॉलर्स देण्यांत येतील. त्याशिवाय त्यांना पत्रव्यवहार मोफत करतां येईल. माजी अध्यक्षांनीं आपल्या कालखंडाचीं स्मृतिचित्रें लिहावीं अगर आपल्या कारकीर्दीतील महत्त्वाच्या कागदपत्रांचें संकलन करावें अशीहि अपेक्षा करण्यांत येत आहे. एका प्रकारें हें काम राष्ट्राचेंच आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं व म्हणून त्या कामाचा खर्च राष्ट्रानें सोसणेंहि उचित दिसतें. माजी अध्यक्षांच्या विधवा पत्नींना दरसाल ५,००० डॉलर्स पेन्शन मिळतें, तें १०,००० पर्यंत वाढविण्यांत येईल.

---

**बिलिमोरिआ येथें नवें इस्पितळ**—बिलिमोरिआ येथें ३॥ लाख रुपये खर्चून एक नवें इस्पितळ स्थापन करण्यांत आलें आहे. इस्पितळांत २० रोग्यांची सोय करण्यांत आली आहे. इस्पितळाच्या इमारतीसाठी चित्रपटाच्या उद्योगधंद्यांतील एक उद्योगपती श्री. बिलिमोरिआ ह्यांनीं १ लाख रुपयांची देणगी दिली आहे व बाकीचा खर्च सरकारनें केला आहे.

**ब्रिटनला अमेरिकेचें कर्ज**—अमेरिकेच्या एक्स्पोर्ट-इंपोर्ट बँकेनें ब्रिटनला ५० कोटी डॉलर्सचें कर्ज मंजूर केलें आहे. ह्या-संबंधींच्या करारावर उभयतां देशांच्या प्रतिनिधींनीं नुकत्याच सह्या केल्या. सुएझ कालव्यासंबंधींचा पेंचप्रसंग ओढवल्यावर ब्रिटनच्या सुवर्णसंचयांत व डॉलर्सच्या सांठ्यांत एकदम घट झाली होती.

**परदेशी वृत्तसंस्थांना दिलेले पैसे**—पाकिस्तान सरकारनें १९५६-५७ सालांत युनायटेड प्रेस ऑफ अमेरिका ह्या वृत्त-संस्थेला ५४ हजार रुपये दिले. त्याशिवाय आणखी दोन पर-देशीय वृत्तसंस्थांना अनुक्रमें २३ हजार व ८ हजार रुपये वर्गणीदाखल देण्यांत आले. पाकिस्तानांतील देशी वृत्तसंस्थांना सुमारें ३॥ लाख रुपयांची प्राप्ति झाली.

**अमेरिकन बँकांची फ्रान्सला मदत**—अमेरिकन बँकांच्या एका गटानें फ्रेंच बँकांना १० कोटी डॉलर्सचें कर्ज देण्याचें ठरविलें आहे. सुएझचा कालवा बंद पडल्यापासून फ्रान्समध्यें पेट्रोल व तज्जन्य पदार्थ ह्यांचा तुटवडा पडला आहे. कर्जाचा उपयोग करून फ्रेंच बँका वरील वस्तूंची खरेदी अमेरिकेंत करणार आहेत.


# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

**मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.**

**शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.**

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७७,००० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. कृ. खोले. — श्री. चं. रा. राठी.

श्री. गो. वा. देवी — श्री. बा. ग. धंदुके.

सरकारी रोखे खरेदी—विक्री, व्याजवसुली, पेन्शन कले-क्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१—६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी
मॅनेजर.



# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

**लक्ष्मी रोड, पुणें शहर.**

**स्थापना : ४ सप्टेंबर, १९१७**

दिनांक १ जानेवारी १९५७ पासून कायम ठेवीचे व्याजाचे दर वाढविले आहेत.

| मुदत | पूर्वीचा दर | नवा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | २ | २½ टक्के |
| २ वर्षें | २½ | २¾ टक्के |
| ३ वर्षें | — | ३ टक्के |
| ५ वर्षें | ३ | ३½ टक्के |
| १० वर्षें | ४ | ४ टक्के |

या बँकेतील ठेवी मुख्यतः सहकारी शेतकी सोसा-यट्यांना भांडवलाचा पुरवठा करण्यासाठींच वापरल्या जातात.

अधिक माहिती पत्रद्वारें अगर समक्ष आनंदानें पुरवूं.

बा. ग. आळतेकर
मॅनेजिंग डायरेक्टर.

## सहकारी कायद्याचें कलम ५० अ

लेखक—श्री. स. वा. कुलकर्णी, बी. ए., एलएल्. बी. पुणें ४.

सहकारी संस्थांच्या कारभारांत कांहीं स्वार्थी, आपमतलबी मंडळींच्या कारवायांमुळें अनेक घोटाळे व गैरकारभार झालेला अवलोकनांत येतो. निष्काळजी, स्वार्थी, अप्रामाणिक व अकार्यक्षम अशी मंडळी सहकारी संस्थांत सत्तेच्या जोरावर वाटेल तो निर्णय घेऊन सहकारी संस्थांच्या पैशाची व मालाची मनास येईल त्याप्रमाणें विल्हेवाट लावतात व यामुळें सहकारी संस्थांचे पदरीं अपयश व नुकसान येतें. असा गैरकारभार करणाऱ्या मंडळींवर नियंत्रण ठेवण्याचे उद्देशानें व झालेली नुकसानी परत भरून मिळण्यासाठी सहकारी सोसायट्यांच्या कायद्यांत हें कलम घातलें गेलें आहे. एकाद्या सहकारी संस्थेचा कारभार गुंडाळतांना अगर कलम २२ अन्वयें आयव्ययनिरिक्षकांचे येणाऱ्या रिपोर्टावरून अथवा कलम ४३ अन्वयें होणाऱ्या चौकशीवरून किंवा ४४ अन्वयें तपासणीअंमलदाराच्या तपासणींत कारभार करणाऱ्या मंडळींकडून संस्थेच्या रकमेचा अगर मालाचा अपहार केलेला आहे व त्या नुकसानीस कांहीं मंडळी जबाबदार आहेत, असें अवलोकनांत आल्यास रजिस्ट्रार को. सो. यांना असा गैरकारभार करणाऱ्या मंडळींची चौकशी करावयाचा अधिकार दिलेला आहे. सदरच्या कलमाखालीं चौकशी करणारा अंमलदार हा डेप्युटी रजिस्ट्रार अगर डिस्ट्रिक्ट कलेक्टरचे दर्जाचा अगर सिव्हिल जज्ज सी. डि. दर्जाचा असला पाहिजे अशी अट सदरचे कलमांत निर्दिष्ट केलेली आहे. ज्या वेळीं ह्या कलमाखालीं चौकशी व्हावयाची असते त्या वेळीं चौकशीचे अधिकार वर नमूद केलेल्या दर्जाच्या अंमलदारास सुपूर्त केले जातात.

कलम ५० अ प्रमाणें आलेल्या प्रकरणांत दिवाणी कायद्याचे असंख्य प्रश्न नेहमींच उत्पन्न होतात व त्या सर्व कायदेशीर प्रश्नांचा विचार झाल्याशिवाय चौकशी–अंमलदारांस निर्दोषी अगर दोषी कोण आहे हें ठरवितां येत नाहीं. चौकशी अंमलदारास त्याबाबत आपलें म्हणणें अभिप्रायासह रजिस्ट्रार यांना कळवावें लागतें व त्यानंतर पुढील हुकूम केले जातात. सदरचे कलमाखालीं होणारी चौकशी ही प्रदीर्घ असते व वर नमूद केलेप्रमाणें त्यांत कायदेशीर गुंतागुंतीचे अनेक प्रश्न उपस्थित झालेले असतात. ह्या चौकशीचे कामीं सरकारास वकील–वर्गाची मदत घेतां येणें सहज शक्य आहे. न्यायदानाचे कामीं वकील–वर्गानें अभ्यासूपणानें सर्व क्षेत्रांत फार महत्त्वाची कामगिरी केलेली आहे, हें कोणीहि नाकबूल करणार नाहीं. सदरच्या कलमाखालीं चौकशी करण्यासाठी जे अंमलदार नेमावयाचे असतात त्यांत कायद्याची संपूर्ण माहिती असलेल्या वकील–वर्गाची योजना कोठेंच दिसत नाहीं. डेप्युटी रजिस्ट्रार अगर डिस्ट्रिक्ट डेप्युटी कलेक्टर अगर सिव्हिल जज्ज सी. डि. यांचेबरोबर ज्या वकिलानें दिवाणी कोर्टांत कमींत कमी सतत ५ वर्षे काम केलेलें आहे अशा तरुण वकिलांची नेमणूक व्हावयास पाहिजे आहे. वकिलांना कायदेशीर प्रश्नांची योग्य ती बाजू लवकर समजते व त्यांचेकडे हे चौकशी–अधिकार दिल्यास थोड्या वेळांत योग्य ती चौकशी होऊन संबंधित पक्षकारांना त्वरित न्याय मिळेल. सदरचे कलमांत ह्या दृष्टीनें योग्य ती दुरुस्ती त्वरित व्हावयास पाहिजे आहे. सदरचे कलमाखालीं होणाऱ्या चौकशीचे कामीं मिळणारा मुशाहिरा वकिलांना द्यावयाचे ठरविल्यास सदर कामीं पुष्कळसे वकील पुढें येऊन दिलेलें काम चोख रीतीनें बजावतील ह्यांत संशय नाहीं. सरकारनें ह्याबाबत कलम ५० अ मध्यें योग्य ती दुरुस्ती करून ती तावडतोब अमलांत आणावी अशी आमची विनंती आहे. वकील-वर्गास ह्याबाबत सरकारनें प्रयत्न करून हें नवें क्षेत्र उपलब्ध करून द्यावें व जिल्ह्यांतील वकील–वर्गाकडे हें काम सोंपवावें. कलम ५० अ खालील कांहीं प्रकरणें सहकारी खात्याकडे आहेत. त्या प्रकरणांचें वांटप होणेचे अगोदर सदरचे कलमांत वर नमूद केलेली दुरुस्ती करून ती अमलांत आणावयास पाहिजे आहे. ह्याबाबत वकीलवर्ग हा नेहमींच सहकार्य देईल व त्यामुळें सदरचे कलमाखालीं होणारी चौकशी ही कायदेशीर होऊन त्वरित न्याय मिळणेस खात्रीनें मदत होईल.

---

## मशीनटूलसचें उत्पादन

हिंदुस्थान मशीन टूल फॅक्टरीनें १९५६–५७ या आर्थिक वर्षासाठी ठरलेले ५७ लेथ तयार करण्याचें लक्ष्य जवळजवळ दुपटीनें पार पाडलें आहे. तसें पाहिलें तर या देशांत १८९० पासून मशीनटूलचें उत्पादन होत आलें आहे. तथापि १९३० पर्यंत ह्या उत्पादनाबाबतची प्रगति समाधानकारक नव्हती. त्यावेळेपर्यंत जेमतेम १०० वस्तूंचें उत्पादन होत असें व तेंहि कारखानदार स्वतःच्या उपयोगासाठी करीत असत. रेल्वे, दारूगोळ्याचे कारखाने व इतर कारखाने, मशीनटूलची आपली गरज आयात टूलवर भागवीत.

परंतु पुढें महायुद्धाच्या परिस्थितींत सरकारनें एक मशीन-टूल डायरेक्टोरेट स्थापन केलें. मशीनटूलचा धंदा देशांत प्रस्थापित करण्याच्या दिशेनें आणि सर्वसाधारण इंजिनियरिंग व इतर कामें करणाऱ्या कारखान्यांतून मशीनटूलचें उत्पादन करण्यास लावण्याच्या दिशेनें योग्य ते उपाय योजण्याचे अधिकार ह्या डायरेक्टोरेटला देण्यांत आले होते. कांहीं कारखान्यांना सरकारनें यंत्रसामुग्रीची मदतहि दिली.

अशा प्रकारें उपाययोजना केल्यामुळें ह्या धंद्याची प्रगति होऊं लागली आणि १९४२ मध्यें भारतांत होणाऱ्या ग्रेडेड मशीनटूलचें एकूण उत्पादन २७३ होतें तें १९४६ मध्यें ८८१० वर गेलें. १९४७ मध्यें देशांत मशीनटूलचें उत्पादन करणाऱ्या २४ ग्रेडेड फर्म व इतर १०० फर्म होत्या.

### हिंदुस्थान मशीनटूल फॅक्टरी

पुढें १९४७ मध्यें भारत सरकारनें एक हंगामी मशीनटूल-समिति नेमली होती. नंतर १९४९ मध्यें स्वित्झर्लंडमधील ओर्लिकॉन मशीनटूल वर्क्स लि. ह्या कंपनीशीं तांत्रिक सहकार्याबाबत करार करण्यांत आला. त्या करारानुसार भारतांत तयार न होणारी हायस्पीड प्रिसीजन मशीनटूल तयार करणारा एक कारखाना तयार करण्याचें ठरलें होतें. तसेंच, त्या करारानुसार, २४० हेव्ही ड्यूटी ड्रिलिंग मशीन, ९०० हायस्पीड लेथ व ४६० मिलिंग मशीन्स अशीं एकूण १६०० यंत्रें प्रतिवर्षी निर्माण करण्याबाबत त्या करारांत तरतूद होती.

त्या करारानुसार स्थापन झालेल्या कारखान्याचा पहिला टप्पा पूर्ण झाला असून, तेथें ८॥ इंची सेंटरचे हायस्पीड लेथ तयार होऊं लागले आहेत.

१९५६–५७ ह्या आर्थिक वर्षांत ५७ लेथ तयार करण्याचें ठरविलें होतें, परंतु आतांपर्यंत १०० लेथ तयार झाले असून, मार्च १९५७ पर्यंत १४२ म्हणजे ठरलेल्या लक्ष्याच्या २५० टक्के उत्पादन होईल.

दुसऱ्या योजनेंत भांडवली खर्चासाठी २ कोटी रुपयांची जादा तरतूद करण्यांत आली आहे. हा कार्यक्रम पुरा झाला पाहिजे. हायस्पीड प्रिसिजन लेथ, मिलिंग मशीन्स, रेडियल ड्रिल्स, सर्क्युलर ग्राइंडर इत्यादि वस्तूंच्या देशाच्या गरजा हा कारखाना संपूर्णतया भागवूं शकेल.

# बँक ऑफ महाराष्ट्र लि. ची वार्षिक सभा

## चेअरमन, श्री. वा. पुं. वर्दे, ह्यांचें अध्यक्षीय भाषण

१९५६ सालीं बँकेनें पांच नवीन शाखा उघडल्या. आतां बँकेच्या एकूण ३४ शाखा झाल्या आहेत. बँकेच्या ठेवी शेंकडा २३ टक्यांनीं वाढल्या असून आतां बँकेकडे एकूण ठेवी रु. ६२६ लाख इतक्या झाल्या आहेत. याच काळांत सर्व शेडयूल्ड बँकांकडील ठेवी फक्त आठ टक्यांनींच वाढल्या ही गोष्ट लक्षांत घेतां आपल्या बँकेची प्रगति नजरेंत भरण्यासारखी वाटते. वृत्तान्ताच्या वर्षी बँकेला रु. ४·०१ लाख इतका निव्वळ नफा झाला. १९५५ च्या वर्षी निव्वळ नफा रु. ३·४६ लाख इतका होता. आपल्या बँकेनें ठेवींच्या ४५ टक्के इतकीं कर्जे दिलीं आहेत आणि उरलेला पैसा रोकड, सरकारी कर्जरोखे व इतर बँकांकडे ठेवी या स्वरूपांत ठेवला आहे. इतर बँकांनीं सर्वसाधारणपणें आपापल्या ठेवींच्या सुमारें ७० टक्के इतकीं कर्जे दिलीं. त्या मानानें आपलें प्रमाण कमी आहे. आपल्यासारख्या बँकेनें ठेवीदारांच्या हितसंबंधांची जपणूक करण्याच्या दृष्टीनें अशा प्रकारची दक्षता आणि सावधगिरी बाळगणें जरूर आहे. यांत तात्कालिक फायदा कमी दिसला तरी दूरवर विचार करतां बँकेनें अवलंबिलेलें धोरणच अधिक किफायतशीर ठरेल असाच आपला अभिप्राय पडेल, असा मला विश्वास वाटतो.

गतवर्षी बँकांकडे पैशासाठी अितकी जबरदस्त मागणी होती कीं ती मागणी पुरी करणें बँकांना त्यांच्याकडे आलेल्या ठेवींच्या मानानें फारच कठीण गेलें. पैशाला भरपूर मागणी असल्यानें लोकांकडील बचत स्वतःकडे आकर्षित व्हावी एतदर्थ निरनिराळ्या मार्गांचा बँकांनीं अवलंब केला. ठेवींसाठी चाललेल्या या स्पर्धेचा एक अनिवार्य परिणाम म्हणजे 'सेव्हिंग्ज' आणि 'अल्प मुदतीच्या ठेवी'चे व्याजाचे दर वाढूं लागले. अशा प्रकारची अनिष्ट स्पर्धा चालू असतांही आपल्या बँकेकडील ठेवी २३ टक्के इतक्या भरघोस प्रमाणांत वाढल्या. यावरून आपल्या बँकेनें व्यापारी जगांत किती यश संपादन केलें आहे आणि लोकांचा विश्वासहि प्राप्त करून घेतला आहे याची प्रचीति येते. ठेवी २३ टक्क्यांनीं वाढल्या तर बँकेनें दिलेलें व्याज २९ टक्क्यांनीं वाढलें. हें सर्व लक्षांत घेता, गतवर्षी झालेला नफा निश्चित समाधानकारक आहे. नफ्यामध्यें ही जी वाढ झाली त्याचें कारण कमिशन, हुंडणावळ आणि दलाली यांपासून होणाऱ्या उत्पन्नांत वाढ झाली हें होय; आणि मला असा विश्वास वाटतो कीं बँकेच्या कार्याच्या विस्ताराबरोबरच अशा प्रकारचें उत्पन्न प्रत्यहीं वाढतच राहील.

### प्रादेशिक बँकांसंबंधीं धोरण

गेलीं कांहीं वर्षे मी बँकांच्या धोरणासंबंधीं ज्या कांहीं गोष्टींचा ऊहापोह केला आहे त्यांतील एकदोन गोष्टींचा पुनरुच्चार करतों. ज्या आर्थिक पद्धतीनें देशाचा विकास व्हावयाचा आहे त्या पद्धतीशीं बँकांची रचना आणि कार्यपद्धति सुसंगत असली पाहिजेत. नियोजन मंडळानें आपल्या देशांतील आर्थिक व्यवस्थेचें विकेंद्रीकरण व्हावें या तत्त्वाचा स्वीकार केलाच आहे. अर्थातच स्थानिक गरजा व परिस्थिति यांचा अभ्यास करून विशिष्ट विभागासाठी सुव्यवस्थित प्रादेशिक बँकांचें जाळें पसरावें हें इष्ट आहे. आपल्या स्थापनेपासून महाराष्ट्र बँकेनें लहान आणि मध्यम आकाराच्या उद्योगधंद्यांसाठी कर्जें देऊन साहाय्य केलें आहे. संतोषाची गोष्ट ही कीं, आतां स्टेट बँकेनें अशाच योजनेसाठी एक अभिनव उपक्रम सुरू केला आहे. तथापि ही गोष्ट निर्विवाद आहे कीं, प्रादेशिक बँका या बाबतींत जें कार्य करूं शकतील तें स्टेट बँकेला जमणार नाहीं. बँकिंग कंपनीज ॲक्ट दुरुस्त झाल्यापासून अशी आशा वाटूं लागली होती कीं, अशा प्रादेशिक बँकांचा उपयोग लहान व मध्यम आकाराच्या धंद्यांना अधिकाधिक व्हावा, एतदर्थ रिझर्व्ह बँक त्यांना योग्य तें मार्गदर्शन करील, साहाय्य देईल आणि सल्ला देईल. खेदाची गोष्ट ही आहे कीं, रिझर्व्ह बँकेच्या एतद्विषयक धोरणांत फारसा बदल दिसून येत नाहीं. मोठ्या बँकांमध्यें ठेवी अधिकाधिक प्रमाणांत केंद्रीत होत आहेत, हीच अनिष्ट प्रवृत्ति प्रबळ होत चालल्याचें गेल्या वर्षीहि दिसून आलें. मला अशी आशा आहे कीं, रिझर्व्ह बँकेचे नवीन गव्हर्नर श्री. अय्यंगार हे या बाबतींत अधिक लक्ष घालून, ज्या आर्थिक पद्धतीनें आपण आपलें नियोजन करावयाचें निश्चित केलें आहे, त्या पद्धतीशीं सुसंगत अशा प्रकारचा बँकांचा विकास होईल असें धोरण स्वीकारतील.

### मॅनेजर, श्री. जोग ह्यांची प्रशंसनीय कामगिरी

बँकेच्या हातून जी अल्पस्वल्प सेवा झाली आणि तिला जें यश मिळालें त्यामध्यें सभासद्वर्ग व बँकेचा नोकरवर्ग यांचें अतिशय साहाय्य झालें आहे. बँकेच्या जगतांत गेलीं कांहीं वर्षे वादंग उठलें, क्वचित् वादळेंहि झालीं. तथापि आपल्या बँकेची याच काळांत अप्रतिहत प्रगति होत राहिली. याचें मुख्य कारण म्हणजे बँकेच्या नोकरवर्गाचें व संचालकवर्गाचे संबंध स्नेहाचे व सलोख्याचे होते. बँकेचे मॅनेजर श्री. जोग यांनीं प्रशंसनीय कामगिरी केली आहे याबद्दल त्यांना धन्यवाद दिले पाहिजेत. मुख्य कचेरींतील व शाखांतील नोकरवर्गानेंहि श्री. जोग यांना दिलेलें सहकार्य अभिनंदनीय आहे. यामुळेंच प्रतिकूल परिस्थितींतहि आपल्या बँकेचा उत्कर्ष झाला आहे. याच वर्षी प्रकृति अस्वास्थ्यामुळें श्रीयुत एस. जी. मराठे हे निवृत्त झाले आहेत. बँकेच्या स्थापनेपासून आजपर्यंत त्यांनीं बँकेची उज्ज्वल सेवा केली आहे. त्यांच्या सल्लामसलतीचा लाभ यापुढें बँकेला मिळणार नाहीं ही खेदाची गोष्ट आहे. श्री. मराठे यांच्या सेवेबद्दल बँक त्यांची चिरऋणी राहील. श्री. मराठे यांना दीर्घ आयुरारोग्य प्राप्त होवो अशी आशा मी आपणां सर्वांतर्फे व्यक्त करतों.

---

**बोटींना लागणारीं एंजिनें**— बोटींना लागणारीं तेलावर चालणारीं एंजिनें तयार करण्याचा एक कारखाना काढण्याचा मध्यवर्ती सरकार विचार करीत आहे. ह्या कामासाठी आंतरराष्ट्रीय प्रसिद्धीच्या कांहीं परदेशी कारखान्यांकडून अर्ज मागविण्यांत येण्याचा संभव आहे. बऱ्याच परदेशी कारखानदारांना ह्याविषयीं आस्था वाटत आहे.

**हंपी येथील विद्युत्-केंद्र**— तुंगभद्रा नदीवरील धरणावर वीज उत्पन्न करणाऱ्या केंद्रांपैकी पहिलें केंद्र गेल्या जानेवारींत चालू झालें. आतां हंपी येथील दुसरें केंद्र एप्रिल महिन्यांत चालू करण्यांत येणार आहे. ह्या केंद्रांत ९,००० किलोवॅट वीज निर्माण करणारीं दोन यंत्रें प्रथम बसविण्यांत येतील.

**कलकत्ता येथें नवें इस्पितळ**— मारवाडी साहाय्यक समाजाचा ४४ वा स्थापना दिन नुकताच साजरा करण्यांत आला. ह्या संस्थेनें कलकत्ता येथें एक नवें इस्पितळ बांधण्याचें ठरविलें असून तें सर्व जातींना खुलें ठेवण्यांत येईल. इस्पितळांत अगदीं अद्यावत् पद्धतीचीं शस्त्रक्रियेचीं व वैद्यकीय उपकरणें ठेवण्यांत येतील.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.